# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड          डि.सी.आर.          दिनांक   ०२/०७/२०१८**

## १) खुनाचा प्रयत्न :-

**मरखेल :-** दिनांक ०२.०७.२०१८ रोजी चे ०८.३० वा. चे सुमारास मौजे हाणेगाव शिवारात, ता. देगलुर जि. नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी शेतीचे वादावरुन गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करुन कुऱ्हाडीने व काठीने मारहाण करुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला. फिर्यादीने पेरलेले कापुस व सोयाबीन पिकाचे ट्रॅक्टरच्या सहायाने नासधुस केली. वगैरे **फिर्यादी मोईज पि. महाबोदिन पांढरे  वय २६ वर्षे व्यवसाय शेती रा. हाणेगाव ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो.स्टे. मरखेल** गुरनं ९९/२०१८ कलम ३०७, ३२४, ३२३, १४७, १४८, १४९, ४४७, ४२७, ५०४ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोनि/गुंगेवाड,  मो.क्र. ९७६५५१६५७७** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४

# <u>अफवावर विश्वास ठेवु नका</u>

धुळे येथे घडलेल्या प्रकार च्या अनुषंगाने मुले पळविणारी टोळी आल्याच्या अफवा पसरवून घबराटीचे वातावरण निर्माण होवुन पाच निष्पापांचा बळी गेला होता. सध्या नांदेड जिल्हयात मुले पळवून नेणारी टोळी कार्यरत असल्याच्या अफवांचे सोशल मिडीयावर पेव फुटले आहे. अनेकजण कुठलीही शहानिशा न करता अशा अफवांचे मेसेज जशास तसे फॉरवर्ड करत आहेत. त्यामुळे गोंधळाचे वातावरण निर्माण होत असुन लहान मुले आणि पालक यात दहशतीचे वातावरण आहे. मागील कांही दिवसात या अफवांचा नाहक त्रास अनेक निष्पापांना सहन करावा लागला. शहरात कामानिमित्त आलेली  अनोळखी माणसे, भिकारी, मनोरुग्ण, भंगार गोळा करणारे आदी लोक अफवांमुळे नागरीकांच्या रागास बळी पडले. अफवावर अंकुश ठेवण्यासाठी पोलीस दलाने अनेक माध्यमातुन जनजागृती साठी प्रयत्न केले. तरी सुध्दा आणखी कांही ठिकाणाहून आशा अफवा पसरविण्यात येत आहेत. तरी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, आपल्या हद्दीत अशा अफवा पसरवणाऱ्यावर लक्ष ठेवुन, त्याबाबत जनजागृती करावी. जनतेला याद्वारे अहवान आहे की, आशा अफवा पसरवुन कायदा हातात घेऊ  नका, संशय असल्यास तात्काळ पोलीसांना कळवा. जो कुणी अशी खोटी माहिती, अफवा पसरवत असेल तर त्याचे विरुध्द कलम ५०५ (१), भादवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात येईल. अशी दक्षता सर्वांनी  घ्यावी.

**पोलीस अधीक्षक नांदेड.**